एस.सी.सी. क्र. ३२४/२०२४

नि.क्र. १०

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – अनिल लहानु पचपींड,

वय – ४० वर्षे, व्यवसाय –शेती,

राहणार– कौठे मलकापुर, ता.संगमनेर.

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.पटेकर यांचेमार्फत**–

घटनेचे वेळी घरी आई, वडील व २ मुले होती. माझ्याकडे बजाज प्लॅटीना कंपनीची एम एच १७ सी बी–८३६१ गाडी आहे. घटना दि.११/९/२०२३ रोजी घडली व तेव्हा माझे भुमी अभिलेख कार्यालय, अ.नगर येथे काम होते. सकाळी ९ वाजता घरुन निघताना मी मामा खंडु ढोकळे यांना खडकवाडी येथुन सोबत घेतले. गाडी मी स्वतः चालवत होतो व कल्याण नगर हायवेवर जात होतो. घटनास्थळी मी सकाळी ११ वाजता आलो होतो. एसटी कल्याणहुन नगरकडे जात होती व ती भरधाव वेगाने आली व ती कंटेनरला ओव्हरटेक केल्यावर तिचा ताबा सुटल्याने डायरेक्ट मोटार सायकलवर आली व बसने मोटार सायकलला समोरुन धडक दिली. माझ्या डोक्याला, हातापायाला त्यामुळे लागले होते व मी बेशुध्द होतो. माझ्यासोबत असणारे मामांना कमरेला व पायाला लागले होते. मला सीटी केअर हॉस्पीटल, नगर येथे शुध्द आली. मला नंतर बसचा नंबर एम एच १४ बी टी २७४२ व चालकाचे नाव पालवे असल्याचे कळाले. मला दि.१६/९/२०२३ रोजी सीटी केअर हॉस्पीटलमधुन डिस्चार्ज मिळाला. त्यानंतर मी दि.२९/९/२०२३ रोजी पोलीस स्टेशनला गेलो कारण मी त्याअगोदर हॉस्पीटलमध्ये होतो. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यातील मजकुर बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. सदर फिर्यादीस नि.११ देण्यात येते. आज रोजी आरोपी ड्रायव्हर न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एम.एस.औटी यांचेमार्फतः**

हे म्हणणे खरे आहे की नगर कल्याण रोड हायवे असल्याने त्यावर नेहमी वाहनांची गर्दी असते. हे म्हणणे खरे आहे की त्या रोडवर बाजुला पाच पाच फुटाच्या डांबरी रोडच्या टु व्हीलरसाठी पट्ट्या मारलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की सदर बस नगर कल्याण रोडने तिच्या डाव्या बाजुने चालली होती. हे म्हणणे खरे नाही की मी मोटार सायकलची पट्टी सोडुन रोडवर गाडी चालवत होतो. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळेस घटना घडली त्यावेळेस मी बेशुध्द पडलो होतो व त्यामुळे बस कोणती होती व बसचा चालक कोण होता हे मला त्यावेळी माहीत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की बसचा नंबर व बसचा चालक कोण होता याबाबत मला ऐकीव माहीती होती व त्याआधारे मी एफआरआय मध्ये बसचा नंबर व चालकाचे नाव टाकले होते. माझ्या मागे बसलेले मामांना सीटी केअर हॉस्पीटलला दाखल केले होते. ते एक दिवस दाखल होते. मी १६ तारखेपर्यंत दाखल होतो. हे म्हणणे खरे आहे की १६ तारखेपर्यंत पोलीस माझा जबाब घ्यायला आले नव्हते व मी स्वतः घटनेबाबत पोलीस स्टेशनला माहीती दिली नव्हती. १६ तारखेपर्यंत मी माहीती दिली नव्हती कारण मी बेशुध्द होतो. मी ४ दिवस बेशुध्द होतो, १६ तारखेपर्यंत बेशुध्द नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की डिस्चार्ज झाल्यानंतर माझी प्रकृती चांगली होती.

प्रश्न– १६ तारखेनंतर ते एफआरआय दाखल करण्यापर्यंत तुम्ही कधीही पोलीस स्टेशनला सदर घटनेबाबत गेला नाहीत?

उत्तर– १६ तारखेनंतर मी साकुरला दाखल होतो.

हे म्हणणे खरे आहे की साकुरला दाखल असल्याचे मी प्रथम आज न्यायालयात सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की मी पोलीस स्टेशनला जबाबात साकुरला दाखल असल्याचे सांगितले नव्हते कारण मला डोक्याला मार लागल्याने सुधरत नसल्याने मी सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी फिर्याद माझ्या सांगण्याप्रमाणे घेतली नाही. हे म्हणणे खरे नाही की मला टु व्हीलरचा वेग हँडल झाला नसल्यामुळे मी स्वतःहुन एसटीला जावुन धडकलो. हे म्हणणे खरे नाही की सदर एसटी मर्यादीत वेगाने तिच्या बाजुने जात होती. हे म्हणणे खरे नाही की एसटी अनावधानाने वेगात जात नव्हती. हे म्हणणे खरे नाही की अपघात माझ्या चुकीमुळे झाला व त्यामुळे मला जखमा झाल्या व अपघातात एसटी चालकाची चुक नव्हती. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी

एफआरआय दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(एन.एस.सबनीस)

दिनांकः ०१/०७/२०२४. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.

<u>एस.सी.सी. क्र. ३२४/२०२४</u>

<u>नि.क्र. १२</u>

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – खंडु मारुती ढोकळे

वय – ५१ वर्षे, व्यवसाय –शेती,

राहणार– खडकवाडी, ता.पारनेर.

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.पटेकर यांचेमार्फत</u>**–

फिर्यादी अनिल हे माझे भाचे असुन ते कौठे मलकापुर येथे राहतात. घटना दि.११/९/२०२३ रोजी ११ वा.चे सुमारास घडली. तेव्हा मी व अनिल गाडीने नगर कल्याण रोडने भुमी अभिलेख कार्यालय, अ.नगर येथे जात होतो. गाडी अनिल चालवत होता व मी पाठीमागे बसलो होतो. अनिलच्या गाडीचा नंबर एमएच १७–सी बी ८३६१असा होता. आम्ही धोत्रे शिवारात असताना व आमच्या डाव्या हाताच्या मोटार सायकलच्या पट्टयावर जात असताना समोरुन एक ट्रक येत होती व तिचे पाठीमागुन एक एसटी त्या ट्रकला ओव्हरटेक करत असताना ती भरधाव वेगाने आली व तिचा ताबा सुटल्याने ती आमच्या मोटार सायकलला समोरुन आदळली. धडकेमुळे आम्ही मोटार सायकलवरुन डाव्या बाजुला पडलो व एसटी बसमध्ये आमची मोटार सायकल अडकली व ३०० फुट फरफटत पुढे गेली. अपघातात अनिलला डोक्याला, हातापायाला व तोंडावर लागले होते व तो बेशुध्द होता आणि मला कमरेच्या खुब्याला, पायाला, डाव्या हाताला लागले होते. सदर एसटीचा नंबर एम एच १४–बी टी–२७४६ असा होता. त्या आरोपीचे नाव पालवे होते. मी नगरला सीटी केअर हॉस्पीटलला गेलो. अपघात एसटी ड्रायव्हरच्या चुकीमुळे झाला. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एम.एस.औटी यांचेमार्फतः</u>**

हे म्हणणे खरे आहे की नगर कल्याण रोड हायवे असल्याने त्यावर नेहमी वाहनांची गर्दी असते. पोलीसांनी माझा जबाब २९ तारखेला माझ्या सांगण्याप्रमाणे घेतला होता.

अपघातात धडक दिल्याने मी साईडला उडुन पडलो व आमची मोटार सायकल बसमध्ये अडकुन ती ३०० फुट पुढे फरफटत नेली हे पोलीसांना सांगितले होते. ते माझ्या पोलीसां समोरील जबाबात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी पोलीसांना धडकेमुळे मला खुब्याला व डाव्या हाताला लागले होते हे सांगितले होते. ते माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहके की सदर बस रोडने डाव्या बाजुने चालली होती. हे म्हणणे खरे नाही की माझ्या भाच्याकडुन गाडी न सांभाळली गेल्यामुळे आम्ही स्वतःहुन बसला धडक दिली. मी हॉस्पीटलला एक दिवस दाखल होतो व त्यानंतर गावात ८ दिवस उपचार घेतले होते. माझा पुरवणी जबाब घेतल्याचे मला आठवत नाही. घटना घडली त्यावेळी मला चालता येत नव्हते पण बोलता येत होते. हे म्हणणे खरे आहे की मी व माझा भाचा डिस्चार्ज झाल्यानंतर दरम्यानचे काळात आम्ही पोलीस स्टेशनला तक्रार दिली नाही. मला हॉस्पीटलमधुन सोडल्यानंतर गावाच्या हॉस्पीटलमध्ये दाखल असल्याने तक्रार दिली नाही. मी १९/९/२०२३ पर्यंत गावाच्या हॉस्पीटलमध्ये दाखल होतो व तेव्हा पोलीस जबाबासाठी हॉस्पीटलला आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की मी घटनेबाबत पोलीसांना माहीती दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की बसकोणती होती व बसचा चालक कोण होता याबाबत मला नंतर माहीती मिळाली. हे म्हणणे खरे आहे की बस कोणतीहोती व तिचा चालक कोण होता याबाबत मला ऐकीव माहीती होती व मी स्वतः याबाबत चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की आमची मोटार सायकल बसला धडकली व यामध्ये बसची काही चुकी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की माझ्या भाच्याच्या सांगण्यावरुन मी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(एन.एस.सबनीस)

दिनांकः ०१/०७/२०२४.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.

एस.सी.सी. क्र. ३२४/२०२४

नि.क्र. १३

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव — शुभम बाळासाहेब टेकुडे

वय — २६ वर्षे, व्यवसाय —शेती,

राहणार– देसवडे, ता.पारनेर.

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए.पटेकर यांचेमार्फत**–

दि.१/१०/२०२३ रोजी पोलीसांनी अपघाता संदर्भात मला धोत्रे शिवारात पंचनाम्यासाठी बोलावले होते. दुपारी १ वाजता मी गेलो होतो. त्यावेळेस पोलीस गायकवाड, अपघातग्रस्त, सतिष म्हस्के व मी होतो. अपघातग्रस्त माहीती सांगत होते व पोलीस लिहुन घेत होते. अपघाताची तारीख मला माहीत नाही. अपघात बस व मोटार सायकलचा झाला होता. माझ्यासमोर काही जप्त केले नाही. फोटो काढले होते. घटनास्थळाच्या उत्तरेस भांडवस्ती, पुर्वेला हायवे, पश्चिमेला माहीत नाही व दक्षिणेला हायवे आहे. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकुर बरोबर असून त्यावर अ.क्र.२ वर माझी सही आहे. त्यास नि.१४ देण्यात येते. पोलीसांनी अपघाती ठिकाणाचे फोटो काढले होते. त्यामध्ये एका फोटोत मी आहे. आता मला ते फोटो दाखवण्यात आले असुन ते तेच फोटो आहेत. त्यास ओळखीसाठी आर्टीकल अ व ब देण्यात येते.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एम.एस.औटी यांचेमार्फतः**

पंचनामा १ वाजता सुरु होवुन १.३० वाजता संपला. पंचनाम्यासाठी पोलीसांनी मला नोटीस दिली नव्हती. मला दुस–या पंचाचे पुर्ण नाव माहीत नाही. त्याचे नाव सतिष म्हस्के आहे. फोटोमध्ये अपघाताच्या खाणाखुणा दिसत नाही. फोटोमध्ये अपघातामध्ये गाडीचे पडलेले पार्ट दिसत नाही. माझ्यासमक्ष पोलीसांनी अपघातात गाडीचे काच किंवा पार्ट जप्त केलेले नाही. घटनास्थळ मला पोलीसांनी दाखवले. हे म्हणणे खरे नाही की

त्यानंतर पोलीसांनी सांगितल्यावर मी त्यावर सही केली. मी सांगतो की कागद वाचला होता. भांडवस्ती कोणत्या गटात होती हे माहीत नाही. मी फक्त साक्षीदार म्हस्के यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की फिर्यादी म्हस्के यांचे नातेवाईक असल्याने मी त्यासाठी आज साक्ष द्यायला आलो. हे म्हणणे खरे नाही की असा पंचनामा झाला नाही व तो अपघात ठिकाणी केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज फिर्यादी हे म्हस्के यांचे नातवाईक असल्याने खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही/-

(एन.एस.सबनीस)

दिनांकः ०१/०७/२०२४.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.३,

पारनेर.